रे.मु.नं. ३४/२०११

अहमद फजलुददीन आढाळ वगैरे १ .. वादी
वि.
इब्राहिम अ. करीम आढाळ व इतर .. प्रतिवादी

## आदेश निशाणी ५ वर

(दिनांक ०८/१२/२०११ रोजी घोषित)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचे विरुध्द दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९ नियम १, २ अन्वये तूर्तातूर्त मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जाची हकीगत थोडक्यात खालील प्रमाणे –

दावा मिळकत ही तालुका कर्जत येथील ग्रामपंचायत बांधिवली हददीतील भूमापन क्रमांक १२१/३ अ, १२१/१ अ, १४/२०, १२२/५ अशा आहेत. दावा मिळकती व्यतिरिक्त वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित अन्य मिळकती होत्या. प्रतिवादींनी त्या मिळकती वादीस माहिती न देता परस्पर विकलेल्या आहेत. दावा मिळकत मुळची वादी व प्रतिवादी यांचे आजोबा दादामियॉं फजलूददीन आढाळ यांच्या मालकीच्या होत्या. ते मयत झाल्यानंतर दावा मिळकती अब्दुल करिम दादामियॉं आढाळ, फजरुददीन दादामियॉं आढाळ, महंमंद इद्रूस दादामियॉं आढाळ, यांचे पुढारी म्हणून करीम दादामियॉं आढाळ यांच्या नावे फेरफार नंबर २०२ अन्वये नोंदविण्यात आली. परंतु वादींच्या वडिलांची नोंद <u>७/१२</u> पत्रकी लावण्याचे राहून गेले. अब्दुल करीम दादामियॉं आढाळ मयत झाल्यानंतर वादींचा हक्क डावलून दावा मिळकती प्रतिवादी नंबर १ ते २७ यांच्या नावे नोंदविण्यात आल्या. वादीच्या वडिलांना किंवा वादींना आजतागायत कधीही त्यांचा अविभक्त हिस्सा विभक्त करुन मिळालेला नाही. महंमंद आढाळ

यांचा हिस्सा तोंडी वाटपाद्वारे मिळालेला आहे. तसेच शरफुददीन आढाळ यांना हिस्सा मिळाल्याचे दिसून येते. प्रतिवादी हे दावा मिळकतीत अन्य इसमांचा हक्क हितसंबंध निर्माण करत आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकती विकल्यास वादींचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादींना सकतदर्शनी केस आहे. न्यायाचा समतोल वादींच्या लाभात आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत त्रयस्त इसमांचा हक्क हितसंबंध निर्माण करु नये असा तुर्तातुर्तमनाई हुकूम त्यांच्याविरुध्द करण्यात यावा अशी मागणी वादींनी केलेली आहे.

३. प्रतिवादी नं. १,८ व ९ यांनी दाव्यास कैफियत व तुतातुर्त ताकीद अर्जास म्हणणे निशाण २७ वर दिलेले आहे. प्रतिवादी नं. ३, १०, १२, १५, १७,१८, व २० यांनी दाव्यास कैफियत व तुतातुर्त ताकीद अर्जास म्हणणे निशाण ३५ वर दिलेले आहे. तसेच प्रतिवादी नं.२, ४ ते ७, ११, १४, १६, १९,२१, २२ या प्रतिवादींनी नि. ३१ वर पुरासीस दाखल केलेलली आहे. व प्रतिवादी नं. १, ८, व ९ ने दाखल केलेली नि. २७ वरील कैफियत स्विकारलेली आहे. सदर प्रतिवादींनी दाव्यातील मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, वादीच्या वडिलांनी त्यांच्या हिश्याच्या मिळकती मौजे बांधिवली ता. कर्जत येथील सर्व्हे नं. <u>८/३</u> सर्व्हे नं. <u>९/०</u> सर्व्हे नं. <u>१२५/१८</u>, <u>१२५/४</u> सर्व्हे नं. <u>१०/३</u> याची विक्री तारीख ०३/१२/१९५६ रोजी दस्त क्रमांक ५८४ अन्वये केलेली आहे. त्यामुळे वादींचा दावा मिळकतींमध्ये कोणत्याही प्रकारचा अविभक्त हिस्सा नाही. तसेच एकत्र मिळकतीमधून दादामियॉ आढाळ शरफुददीन इढाळ, सोनाबाई टिवाळे, बेगमबी अब्दुल रज्जाक टिवाळे व सावत्र आई खुरदबी दादामियॉ आढाळ या सर्वांना ज्यांचे त्यांचे हिस्से दिलेले आहेत. त्यामुळे वादींना सदरचा दावा दाखल करण्याचा

कोणताही हक्क व अधिकार नाही. तसेच मुस्लीम पर्सनल कायदयानुसार मुसलमान समाजात एकत्र कुटूंबाचा पुढारी नसतो. वादीच्या वडिलांनी य ापूर्वी मिळकती विकल्या असल्यामुळे त्यांना प्रतिवादींच्या विरुध्द कोणतीही दाद मागता येणर नाही. त्यामुळे वादींचा मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी मागणी प्रतिवादींनी केली आहे.

४. प्रतिचादी नं. २३ ते २७ यांना दाव्याचे समन्स व नोटीस बजावणी होवून ते गैरहजर राहिले त्यामुळे त्यांच्या विरुध्द सदरचा दावा एकतर्फा चालविण्याचा हुकूम नि. १ वर पारित करण्यात आला.

५. माझ्या निर्णयाकरीता जे मुद्दे उपस्थित झाले ते माझ्या निष्कर्षासहीत खालील प्रमाणे –

| ६. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीनी तुर्तातुद मनाई हुकूम मिळण्यासाठी सकृतदर्शनाी केस मांडली आहे का ? | नाही. |
| २ | दाव्याचा कल वादीच्या बाजूने आहे असे त्याने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ३ | तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज फेटाळल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल असे वादीने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे. |

## कारणमिंमासा

७. मुद्याा कमांक १ ते ४ –

मुद्या कमांक १ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे

एकत्रात चौकशीस घेण्यात आलेले आहेत.

८. वादीचे विद्वान वकील श्री पेठे यांनी युक्तीवाद केला की दावा मिळकत ही वादी वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची आहे. अद्याप पर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीतील वादींचा हिस्सा सरस निरस मानाने तुटक वाटप करुन दिलेला नाही. प्रतिवादींनी सदरची मिळकत आपल्या नावावर वादींचा हक्क डावलून करुन घेतलेली आहे. तसेच प्रतिवादींनी यापूर्वीही दावा मिळकती व्यतिरिक्त अन्य मिळकती वादींच्या सहमतीविना विक्री केलेली आहे. प्रतिवादी सद्या दावा मिळकत विकण्याच्या विचारात आहे. व तशी त्यांनी स्थानिक वत्तपत्रामध्ये जाहिर नोटीस दिलेली आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीची विक्री केल्यास वादींचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

९. प्रतिवादीतर्फे वकिल श्री. डिमेलो यांनी युक्तीवाद केला की, वादी प्रतिवादी यांच्या दरम्यान यापूर्वीच मिळकतींचे वाटप झालेले आहे. व त्यांच्या हिश्याला मिळकती देण्यात आलेल्या आहेत. वादीच्या वडिलांच्या हिश्याला आलेल्या मिळकती त्यांनी पूर्वीच नोंदणीकृत दस्ताने विकलेल्या आहेत. तसेच मुस्लीम कायदयामध्ये एकत्र कुटूंबाचा पुढारी अशी संकल्पना हिंदू कायदयाप्रमाणे नाही.

१०. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी फेरिस्त निशाण ३ सोबत दावा मिळकतीचे सात बारा उतारे हजर केलेले आहेत. सदर मिळकतींच्या भोगवटादार सदरी प्रतिवादी यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. तसेच वादी यांनी फेरफार नं.२०२ चा उतारा दाखल केलेला आहे. त्यावरुन असे उिसून येते की, दादामियॉ फजलू आढाळ हे दि. १३/११/१९३५ रोजी मयत झाले.

त्यांच्या मत्यूनंतर त्यांचे मुलगे १. अब्दुल करिम २. फजलुददीन ३. महंमद इद्रूस या सर्वांचे पुढारी म्हणून अब्दुल करिम दादामियॉ आढाळ यांची नोंद मिळकतीस झाल्याचे दिसून येते. फेरफार २१० चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि. १८/०६/१९३६ रोजी आपापसात वाटप झाले. व अब्दुल करिम आढाळ, महंमद इद्रूस आढाळ फजलूददीन दादामियॉ आढाळ यांनी लिहून दिलेल्या जबाबाच्या आधारे शरफुददीन, फजलुददीन यांच्या हिश्यास काही मिळकती देण्यात आल्या व त्यांची नोंद महसूल दप्तरी करण्यात आली. तसेच फेरफार नं. ८९ चे अवलोकन केले असता दि. १५/०४/१९३१ रोजी तोंडी वाटप होवून महंमद इद्रूस दादामियॉ आढाळ यांच्या वाटणीस काही मिळकती देण्यात आल्या होत्या. अभिलेखावरील वादीतर्फे हजर करण्यात आलेला कागदोपत्री पुरावा पाहिला असता असे दिसून येते की, दादामियॉ फजलू आढाळ यांच्या मत्यूनंतर त्यांच्या मिळकतींचे वाटप १५/०४/३१ व १८/०६/३६ रोजी झाले. प्रतिवादी य ांनी फेरिस्त निशाण ४२ सोबत फरोक्त खताची झेरॉकस प्रत हजर केली आहे. सदर फरोक्त खतावरुन असे दिसून येते की, अब्दुल करिम दादामियॉ आढाळ म्हणजेच प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे वडिल व फतलूददीन दादामियॉ आढाळ म्हणजेच वादी नं. १ व २ यांचे वडिल यांनी सर्व्हे नं. ८/३, सर्व्हे नं. ९/० सर्व्हे नं. १२५/१८, सर्व्हेनं. १२५/४ सर्व्हे नं. १०/३ या मिळकती धोंडू गणपत निमणे यांना विक्री केली असल्याचे दिसून येते.

११.　अभिलेखावरील सर्व पुराव्याचा विचार केला असता दावा मिळकतीशी वादी यांचा कसा संबंध आहे. असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा वादी यांनी अभिलेखावर आणलेला नाही. याउलट वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, दादामियॉ आढाळ यांच्या मिळकतीचे वाटप त्यांच्या मत्यू नंतर झालेले आहे. तसेच वादी यांच्या

वडिलांनी काही मिळकती विक्री केले असल्याचे दिसून येते. वास्तविक दादामियॉ आढाळ यांच्या मत्यू नंतर १९३१ व १९३६ या सालात त्यांच्या मिळकतींचे वाटप होवून मिळकती त्यांच्या वारसांच्या नावे नोंदविण्यात आल्या होत्या. परंतु सुमारे ७५ वर्षामध्ये वादी अगर त्यांचे वडिलांनी याबाबत कोणतीही हरकत घेतली नाही. त्यामुळे सकतदर्शनी असे दिसून य ेते की, वादी यांनी केलेली मागणी ही प्रदिर्घ काळानंतर केलेली आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे वादी यांचे वडिल फजलुददीन आणि अब्दुल करिम यांनी काही मिळकती १९५६ साली विक्री केल्या आहेत. परंतु सदरची बाब वादी यांनी अभिलेखावर आणली नाही. याउलट दावा मिळकती व्यतिरिक्त अन्य मिळकती प्रतिवादी यांनी विकल्या अशा प्रकारचे कथन वादीनीं केले आहे. यावरुन असे दिसून येते की, वादी यांनी न्यायालयापासून महत्वाच्या बाबी लपवून ठेवल्या (suppressed material facts) वादींनी मागितलेला दिलासा हा समन्यायी दिलासा (equitable relief) आहे. परंतु वादी यांनी न्यायालयापासून महत्वाच्या बाबी लवपून ठेवल्या. तसेच सुमारे ७५ वर्षाहून अधिक काळानंतर वाटणीबाबत हरकत वादी घेत आहे. त्यामुळे मला असे वाटते की, वादी यांना सकृतदर्शनी केस नाही. तुतातुर्त मनाईचा हुकूम वादी यांच्या मागणीप्रमाणे न दिल्यास वादी यांचे कोणतेही पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार नाही. त्यामुळे मुददा नं. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे. मुददा नं. ४ चे उत्तर म्हणून मी खालील आदेश पारित करीत आहे.

१२. **<u>आदेश</u>**

१. वादींचा तुतातुर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

कर्जत (आर.एस.रोटे)
दिनांक : १२/१२/२०११ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,कर्जत.

जिल्हा - रायगड.